ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख १७ मार्च, १९५४ | अंक ११

## विविध माहिती

**नागपूर शहराच्या विस्ताराची योजना**—नागपूर शहराच्या विस्ताराची योजना नागपूर इंप्रूव्हमेंट ट्रस्टनें मंजूर केली असून ती आतां राज्य-सरकारच्या अनुमतीसाठी पाठविण्यांत आली आहे. नागपूर शहर अधिक सुंदर करून त्यांत क्रीडांगणें, बागा व इतर आधुनिक सोयी करण्यांत येणार आहेत. शहरांतील गलिच्छ वस्तींचा भाग नाहींसा करण्यांत येणार आहे.

**बिहारची औद्योगिक पाहणी**—उद्योगधंद्यांत राबणाऱ्या कामगारांच्या कर्जबाजाराच्या परिस्थितीची पाहणी करण्याचें बिहार राज्य सरकारनें ठरविलें आहे. जमशेदपूर, कथिहार, दालमिआनगर, कोडारामा, सिंद्री, इत्यादि प्रमुख औद्योगिक केंद्रांचा समावेश पाहणींत करण्यांत येणार आहे.

**कोळीसागर योजनेचा लाभ**—हैद्राबाद राज्यांतील कोळीसागर योजना पूर्ण होत आली असून तीमधील पाणी येत्या जून महिन्यापासून कालव्यांत सोडण्यांत येणार आहे. ह्या धरणाच्या पाण्यानें ४,००० एकर जमिनीला पाण्याचा निश्चित पुरवठा होईल. ह्याच ठिकाणीं एक सहकारी वीज-केंद्र काढण्यांत आलें आहे. केंद्रांतून फक्त भागीदारांनाच वीज पुरविली जाते.

**मध्यप्रदेशांतील भूमिहीन मजूर**—मध्य प्रदेश सरकारनें राज्यांतील भूमिहीन मजुरांच्या मुलांना मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण मोफत देण्याचें ठरविलें आहे. ह्या कार्यासाठी १० लाख रुपये रकमेची तरतूद अंदाजपत्रकांत करण्यांत आली आहे. अशाच प्रकारची शैक्षणिक सवलत कमी पगारवाल्या सरकारी नोकरांच्या मुलांना आणि जिल्हा लोकलबोर्डाच्या नोकरांच्या मुलांना गेल्या वर्षी देण्यांत आली आहे.

**ब्रिटनची सायकलींची निर्यात**—गेल्या वर्षी ब्रिटननें उत्तर अमेरिकेंत ४,०२,००० सायकलींची निर्यात केली. शिवाय ६०,००० सायकली कॅनडाला निर्यात केल्या. परंतु आतां हॉलंड, बेल्जम आणि फ्रान्स हेहि देश स्वस्त सायकलींची निर्यात करून ब्रिटनशीं स्पर्धा करूं लागले आहेत.

**अणुशक्तीची शेगडी**—अमेरिकेच्या अणुशक्ति-समितीनें अणुशक्तीपासून उष्णता निर्माण करणारी छोटी शेगडी निर्माण करण्याचें ठरविलें आहे. तिचा उपयोग लष्करी ठाण्यासाठी करण्यांत येणार आहे. शेगडी तयार करण्याच्या कामीं खाजगी कंपन्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून घेतला जाईल.

**काथ्याच्या सहकारी संस्था**— त्रावणकोर-कोचीनमधील काथ्याच्या २६ सहकारी संस्थांना ३·५२ लाख रुपयांचीं कर्जे देण्याचें राज्य-सरकारनें ठरविलें आहे. कर्जाच्या रकमा ५,००० रुपयांपासून २५,००० रुपयांपर्यंत असतील.

**गालिच्यांची निर्यात वाढली**—भारतामधून ब्रिटनला निर्यात होणाऱ्या गालिच्यांच्या संख्येंत वाढ झाल्याचें समजतें. १९५२ सालीं ७,९९,००० चौरस वार क्षेत्रफळाचे गालिचे निर्यात करण्यांत आले होते. १९५३ सालीं १२,३४,००० चौरस वार क्षेत्रफळाचे गालिचे निर्यात करण्यांत आले. लोकरीच्या निर्यातींत मात्र फारसा फरक पडलेला नाहीं.

**उत्तर प्रदेशाची दुसरी पंचवार्षिक योजना**—उत्तर प्रदेश सरकारनें राज्याची दुसरी पंचवार्षिक योजना आंखण्यास सुरुवात केली आहे. योजनेचें अंतिम स्वरूप भारतीय सरकारकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीवर अवलंबून आहे. राज्याच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेवर एकूण १३० कोटी रुपये खर्च होईल असा अंदाज आहे.

**बिहार राज्याला मदत**—भारताच्या नियोजन समितीनें बिहारमधील योजनेचा विस्तार करण्याचें मान्य केलें आहे. राज्य-सरकारला २३६ लाख रुपयांचें कर्ज देण्यांत यावयाचें असून त्याचा उपयोग मुख्यतः नव्या वीज-निर्मितीच्या केंद्रांच्या उभारणीसाठीं करण्यांत येणार आहे. भारतीय सरकारकडून मिळणारी मदत लक्षांत घेऊन विजेच्या प्रसाराच्या नवीन योजना आंखण्यांत आल्या आहेत.

**आशिआंतील भाषांसाठी शाळा**—बनारस विद्यापीठानें आशिआंतील भाषा शिकविण्यासाठीं जी शाळा काढण्याचें ठरविलें आहे, तिला मदत म्हणून भारतीय सरकारनें १ लाख रुपये मंजूर केले आहेत. शाळा पुढील जुलैपासून सुरू होणार असून तींत चिनी, जपानी व तिबेटी भाषा शिकविण्याची व्यवस्था करण्यांत येईल.

**बटाट्यांपासून रबराची निर्मिति**—सोव्हिएट शास्त्रज्ञांनीं बटाट्यापासून रबर तयार करण्याची कृति शोधून काढली आहे. ह्या कृत्रिम रबराच्या निर्मितीसाठीं लाकडाचा भुसा, रद्दी कागदाचा लगदा, ह्यासारख्या निरुपयोगी गोष्टींचाहि उपयोग करून घेण्यांत येत आहे. रशिआची रबराची बरीच मोठी गरज ह्या कृत्रिम रबरानें भागविण्यांत येत आहे, असें समजतें.

**कृत्रिम तांदूळ तयार करणार**—कृत्रिम तांदूळ तयार करण्याची यंत्रसामुग्री विकत घेण्याचें भारत-सरकारनें ठरविलें आहे. यंत्रांच्या साह्यानें रोज १ टन कृत्रिम तांदूळ तयार होईल, असें समजतें. येत्या सप्टेंबरपासून तांदूळ तयार होऊं लागेल आणि मर्यादित भागांत तो वांटला जाईल. त्याची आहारविषयक उपयुक्तताहि अजमावण्यांत येईल. अशा प्रकारचा तांदूळ जपानमध्यें आणि ऑस्ट्रेलिआंत तयार करण्यांत आला असून त्या देशांनीं तो भारताला पुरविण्याची तयारीहि दाखविली होती.

**खांडवा-हिंगोली रेल्वेचा मार्ग**—खांडवा ते हिंगोली ह्या रेल्वेच्या नव्या रस्त्याच्या बांधणीला रेल्वेबोर्डानें मंजुरी दिली आहे. हा मार्ग अरुंद रुळांचा असून तो अकोलामार्गे नेण्यात येणार आहे. रस्त्यासाठी सुमारें ८,९०,००,००० रुपये खर्च येईल. उत्तर भारत व दक्षिण भारत ह्यांच्यामधील अरुंद रुळाचे रस्ते ह्या नव्या मार्गानें जोडले जातील आणि रुंद रुळावरील रेल्वेवर पडणारा वाहतुकीचा भार कमी होईल.

**भारतामधील लोखंड**—भारतांत सांपडूं शकणाऱ्या उच्च प्रतीच्या लोखंडाच्या मातीचा अंदाज सरकारच्या भूस्तरखात्यातर्फे प्रसिद्ध करण्यांत आला आहे. ह्या मातींत ६० टक्केपर्यंत शुद्ध लोखंड निघूं शकतें. लोखंडाच्या खाणी बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश, म्हैसूर, सांडूर, मद्रास आणि प. बंगाल ह्या राज्यांत मुख्यत्वेंकरून आहेत.

**इजिप्त-रशिआ व्यापारी करार**—इजिप्त आणि रशिआ ह्यांच्या दरम्यान झालेल्या व्यापारी कराराला इजिप्शिअन मंत्रिमंडळानें मान्यता दिली आहे. हा करार ऐनजिनसी देवाण-घेवाण करण्याचा आहे. १०,००,००० इजिप्शिअन पौंड किंमतीचा कापूस घेऊन तेवढ्याच किंमतीचें पेट्रोल इजिप्तला रशिआ पुरविणार आहे.

**पाकिस्तानांत कापडाच्या गिरण्या**—पाकिस्तानांत सरकार-जवळ दोन कापडाच्या नव्या गिरण्या चालू वर्षांत उभारण्यांत येणार आहेत, असें समजतें. ह्या दोन्ही गिरण्यांत मिळून २०,००० सुताच्या चात्या असतील.

**ब्रिटनमधील वृत्तपत्रें**—ब्रिटनमधील वृत्तपत्रांनीं १,००,००० टन जादा कागद आयात करण्याची परवानगी सरकारकडे मागितली आहे. परवानगी देण्यांत आल्यास पुढील वर्षापासून ब्रिटनमधील वृत्तपत्रें अधिक मोठे अंक देऊं लागतील. नव्या आयातींपैकीं निम्मा कागद बहुधा कॅनडाकडून आणण्यांत येईल.

**सीलोनमधील सरकारी मालकीचे धंदे**—सीलोनमधील सरकारच्या मालकीच्या उद्योगधंद्यांसाठी स्वतंत्र कॉर्पोरेशन्स स्थापन करण्यांत येऊन ते चालविण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यांत येईल, असें समजतें. कॉर्पोरेशन्सवर फडणिशी खात्याचें सुद्धां नियंत्रण राहणार नाहीं.

**म्हैसूर राज्यांतील बेकारी**—म्हैसूर राज्यांतील बेकारीचें प्रमाण आणि स्वरूप ह्याविषयीं माहिती गोळा करण्याच्या हेतूनें राज्य-सरकारनें तपासणी करण्याचें ठरविलें आहे. म्हैसूर राज्याचे डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर हेच राज्याचे आंकडे-शास्त्रज्ञ आहेत. तेच ही माहिती गोळा करणार आहेत.


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.


एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :


ब्रँच सेक्रेटरी.



किर्लोस्कर

पॉवरवर चालणारे





वसंत नं. ३ चरक

" शरद चरक "

उसाचे चरक

हंगाम नजीक आला !

—सविस्तर माहितीसाठी आजच लिहा.—

किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी, (जि. द. सातारा)



दि

प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २. ( टे. नं. २७६३ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,२४,९१० |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

टे. नं. २६०७

# अर्थ

बुधवार, ता. १७ मार्च, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रशिआची नवी व्यापारी आघाडी

रशिआचें सरकार बाहेरच्या जगाकडून अधिकाधिक प्रमाणांत माल घेण्यास उत्सुक आहे, ह्याविषयीं आतां शंका राहिलेली नाहीं. ब्रिटनमधील कांहीं उद्योगपती नुकतेच मॉस्कोला जाऊन आले आणि येतांना त्यांनीं १·६ कोटी पौंडांच्या मालाच्या मागण्याहि खिशांत घालून आणल्या. आणखी ४·८ कोटी पौंड किंमतीच्या मालाच्या मागण्या रशियाकडून येतील अशीहि अपेक्षा करण्यांत येत आहे. ब्रिटनप्रमाणेंच रशिआनें प. युरोपांतील देशांकडेहि मालाच्या मागण्या नोंदविल्या आहेत. ह्या सर्व औद्योगिक मालाच्या बदला रशिआ किंमत कशी देणार असा प्रश्न साहजिकच उभा राहतो. गेल्या वर्षापासूनच रशिआला पौंडाच्या चलनाची आणि इतर पाश्चिमात्य राष्ट्रांच्या चलनाची चणचण भासूं लागली आहे. गतवर्षी ब्रिटननें रशिआला अवघ्या १·२ कोटी पौंड किंमतीचा माल निर्यात केला. उलटपक्षीं, ब्रिटननें रशिआकडून घेतलेल्या मालांतहि अशीच घट झाली. तरी पण ह्या आयात मालाची किंमत ३·६ कोटी पौंड झाली. म्हणजे ब्रिटन–रशिआ व्यापारांत २·८ कोटी पौंड किंमतीची अनुकूल तफावत रशिआच्या बाजूनें पडली. युद्धानंतर ब्रिटन आणि रशिआ ह्यांच्यांतील व्यापार सुरू झाल्यावर इतकी तफावत पहिल्यानेंच पडली. फक्त १९५१ सालींच काय ती अधिक अनुकूल तफावत पडली होती. असें असतांना रशियाला पौंडांची टंचाई भासूं लागली, हें कसें ?

ह्याचें उत्तर असें आहे कीं, रशिआनें पौंडांच्या गटांतील इतर देशांकडून अनपेक्षित खरेदी केली. ही खरेदी मुख्यत: कच्च्या मालाची झाली. लोकर, कापूस, ताग, रबर, टिन इत्यादि माल रशिआनें आपल्या पौंडी गंगाजळींतून घेतला. रशिआ पाश्चात्य राष्ट्रांकडून पक्का माल घेत आहे व बाहेरून कच्च्या मालाचीहि खरेदी करीत आहे. पण त्यांत विसंगत असें कांहींच नाहीं. रशिआनें आपला औद्योगिक विकास पोट खपाटी नेऊन केला. आतां ह्या आर्थिक त्यागाचीं फळें रशिअन जनतेला लवकर देण्याचें धोरण सरकारनें स्वीकारलेलें आहे. तेव्हा गरजेच्या पक्क्या वस्तू बाहेरच्या देशाकडून खरेदी करणें आणि देशांतही त्यांचें उत्पादन वाढविणें योग्यच आहे ह्या धोरणानें हरघडी लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा लवकर वाढून नागरिकांचें राहणीचें मान जलद सुधारेल हें उघडच आहे. तथापि कच्चा माल आणि पक्का माल दोन्ही आयात करण्यासाठी रशिआला आपली निर्यातही योग्य प्रमाणांत वाढवावी लागेल. इतर मागासलेल्या देशांची आणि रशिआची ह्या बाबतींतील परिस्थिति वेगळी आहे. निर्यात करण्याचें सामर्थ्य वाढवीपर्यंत मागासलेले देश आयातीची किंमत परदेशी कर्जामधून देऊं शकतात; पण रशिआची गोष्ट तशी नाहीं. तथापि दोन महायुद्धांच्या मधल्या काळांत रशिआनें दीर्घ मुदतीचीं कर्जे घेऊन आयात चालू ठेवली होती, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. रशिआला अन्नधान्याची पैदास वाढवून तें निर्यात करतां येईल काय? धान्य–निर्यात करण्याची रशिआची परंपरा फार जुनी आहे. पण रशिआंतील जनतेच्या राहणीचें मान वाढविण्याचे जोराचे प्रयत्न चालू असल्यानें धान्याची अंतर्गत मागणी वाढतच जाणार. अर्थात्, धान्याच्या रूपानें आयातीची किंमत देणें कठीणच जाणार.

आयातीची किंमत देण्याचा दुसरा मार्ग म्हणजे सोनें देणें. गेल्या सहा महिन्यांत रशिआनें हा मार्ग अनुसरलेला दिसतो. ह्या मार्गानें रशिआची परदेशी चलनाची गरज कांहीं प्रमाणांत भागेल हें खरें; पण, मॉस्को येथें व्यापारी वाटाघाटीसाठी गेलेल्या ब्रिटिश प्रतिनिधींशीं रशिअन व्यापारी–मंत्र्यानें जीं बोलणीं केलीं त्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, परकीय चलनाची गरज संपूर्णपणें भागवावयाची असेल तर औद्योगिक कच्चा मालहि रशिआला निर्यात करावा लागेल. हा कच्चा माल रशिआजवळ बराच आहेहि. गेल्या कांहीं महिन्यांपासून रशिआंतील क्रोम, मँगेनीज, कच्चें लोखंड, तेल, चांदी, प्लॅटिनम, इत्यादि खनिजें प. युरोपांतील बाजारपेठेंत पुन्हा दिसूं लागलीं आहेत. परदेशी चलन मिळविण्याच्या इच्छेनें हा माल रशिआ उतरत्या किंमतींनें बाजारांत लोटीत आहे, अशी भीति व्यक्त करण्यांत येत आहे. पण वास्तविक अशी भीति वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. रशिआ आपल्याजवळील माल वाटेल त्या उतरत्या किंमतीला काढून टाकण्यास तयार आहे असा त्याचा अर्थ नाहीं. जागतिक बाजारपेठेंत मालाची जी किंमत असेल त्याच्या खालीं माल विकण्यास रशिआ तयार होणार नाहीं. ह्या सर्व चर्चेचा अर्थ इतकाच कीं, रशिआशीं होऊं शकणाऱ्या व्यापारांत एकदम फार मोठी वृद्धि होईल असें मानण्यास पुरेशी जागा नाहीं. खरा प्रश्न आहे तो असा कीं, रशिआला बाहेरून माल आणण्याची कितीहि इच्छा असली तरी त्यासाठी द्यावयास लागणारा निर्यातीचा माल तो देऊं शकेल कीं नाहीं, ह्या प्रश्नाच्या उत्तरावर पूर्व–पश्चिम व्यापाराचें भवितव्य अवलंबून आहे.

---

## कंपनी कायद्यांतील दुरुस्त्या अल्पमतवाल्यांना व्हीटोचा अधिकार देणार

नव्या कंपनी कायद्यांत योग्य अशा व्यवसायवृद्धीस आड काठी आणणाऱ्या ज्या तरतुदी आहेत, त्या इष्ट पद्धतीनें सुधारण्यांत याव्यात, अशी आग्रहपूर्वक विनंति फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या वार्षिक सभेनें एका ठरावान्वयें सरकारला केली आहे. अशी दुरुस्ती केली नाहीं, तर लिमिटेड कंपन्यांच्या वाढीस अडथळा येऊन औद्योगीकरणाची प्रगति होणार नाहीं, असा इशारा फेडरेशननें दिला आहे. "कंपनी कायद्याचें आतांपर्यंतचें तत्त्व असें, कीं बहुसंख्यांकांचा अधिकार चालावा. परंतु, नव्या बिलांत अल्पसंख्यांकांना जे अधिकार दिले आहेत, त्यामुळें त्यांना युनायटेड नेशन्समधील प्रमाणें "व्हीटो"चा अधिकार प्राप्त होणार आहे. मॅनेजिंग एजन्सीच्या कारभारावर बंधनें घालण्याच्या नादांत सरकारनें फारच पुढची मजल मारली आहे." असें मत ठरावावरील चर्चेत व्यक्त झालें.

## बँकांच्या ठेवी व कर्जें ह्यांवरील व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें बँकांच्या ठेवींवरील व कर्जांवरील व्याजाबाबत पहाणी केली आहे, तिचा स्थूलमानानें निष्कर्ष खालीलप्रमाणें आहे. सप्टेंबर १९५३ रोजींच्या आंकड्यांवर तो आधारलेला आहे. ह्या पहाणींत ८७ शेड्यूल्ड बँकांच्या व १०७ (कांहीं नमुन्यादाखल घेतलेल्या) बिगर शेड्यूल्ड बँकांच्या ८५८ कोटी रुपयांच्या ठेवींचा अभ्यास केलेला आहे. त्याचप्रमाणें, त्यांच्या ४५२ कोटी रुपयांच्या कर्जांचीहि छाननी त्यांत आहे.

एकूण ८५८ कोटी रु. ठेवींपैकी ८२३ कोटी रु. शेड्यूल्ड बँकांतील ठेवींचे आहेत आणि हिशेबांत घेतलेल्या बिगर शेड्यूल्ड बँकांत ३५ कोटी रुपयांच्या ठेवी (एकूण ठेवींच्या ४०%) आहेत. ८५८ कोटी रु. च्या ठेवींपैकी २२४ कोटी रुपयांवर (२६%) कांहींहि व्याज देण्यांत आलें नाहीं. २४० कोटी रुपयांवर (२८%) १% पर्यंत व्याज देण्यांत आलें आणि १३१ कोटी रुपयांवर (१५%) १ ते २% व्याज दिलें गेलें. सुमारें २०२ कोटी रुपयांवरील (२४%) व्याजाचा दर २ ते ३% होता. उरलेल्या ६१ कोटी रुपयांवर (७%) तो ३% पेक्षा जास्त होता.

हिशेबांत घेतलेल्या सर्व बँकांनीं मिळून दिलेल्या ४५२ कोटी रुपयांच्या कर्जांत शेड्यूल्ड बँकांचीं कर्जें ४३१ कोटी रु. व बिगर शेड्यूल्ड बँकांचीं २१ कोटी रु. होतीं. एकूण कर्जांपैकी ५ कोटींच्या कर्जांवर १% पर्यंत व्याज आकारण्यांत आलें, २१ कोटी रुपयांवर १ ते ३%, ३६८ कोटी रुपयांवर ३ ते ६% आणि ५७ कोटी रुपयांवर ६% पेक्षा ज्यास्त व्याज आकारण्यांत आलें.

ठेवींवर दिलेलें व्याज आणि कर्जांवर घेतलेलें व्याज ह्या दोन्हीं बाबतींत लहान बँकांचे दर भारी होते. लहान बँका ज्या क्षेत्रांत व्यवहार करतात, तेथें उपलब्ध पैशाच्या मानानें मागणी मोठी असते आणि भागीदारानें पैसे गुंतविण्यांत धोकाहि ज्यास्त असतो. त्यामुळें ठेवींवर ज्यास्त व्याज देणें त्यांना गैरसोईचें वाटत नाहीं.

### ठेवींवरील व्याजाचा सरासरी दर

| बँका | % |
|---|---|
| शेड्यूल्ड बँका | १·२५ |
| त्यापैकीं हिंदी शेड्यूल्ड बँका | १·२७ |
| एक्सचेंज बँका | १·१७ |
| प्रमुख मोठ्या हिंदी शेड्यूल्ड बँका | १·०६ |
| १० ते २५ कोटी ठेवींच्या हिंदी शे. बँका | १·४७ |
| १ ते १० कोटी " " " | २·० |
| १ कोटींच्या खालील " " | २·१० |
| बिगर-शेड्यूल्ड बँका | २·२९ |

### कर्जांवरील व्याजाचा सरासरी दर

| बँका | % |
|---|---|
| शेड्यूल्ड बँका | ५·०२ |
| हिंदी शेड्यूल्ड बँका | ५·१८ |
| एक्सचेंज बँका | ४·६१ |
| प्रमुख मोठ्या हिंदी शेड्यूल्ड बँका | ४·७५ |
| १० ते २५ कोटी ठेवींच्या " " " | ५·५५ |
| १ ते १० कोटी " " " " | ६·३६ |
| १ कोटींच्या खालील " " " | ६·६९ |
| बिगर-शेड्यूल्ड बँका | ६·८७ |

## "पूर्णकर" होण्याचा अर्थमंत्र्यांचा प्रयत्न

कौन्सिल ऑफ स्टेटसमध्यें बजेटवरील चर्चेला उत्तर देतांना, भाषणाचे अखेर अर्थमंत्री श्री. देशमुख म्हणाले:—

"एका सभासदानें मला सांगितलें, कीं गाईची धार काढतांना वासरालाहि थोडें दूध शिल्लक ठेवा."

'राजन् दुधुक्षसि यदि क्षितिधेनुमेनाम् ।
तेनाद्य वत्समिव लोकममुं पुषाण ॥'

माझें त्यावर म्हणणें असें कीं,

वत्सोज्झितांशमपि मे यदि सा प्रयच्छेत् ।
कार्योन्मुखः सपदि पूर्णकरो भवेयम् ॥'

"म्हणजे, वासरानें पिऊन शिल्लक ठेवलेलें दूध गाईनें चोरून धरलें नाहीं आणि मला तें घेऊं दिलें तरी मी संतुष्ट आहें. 'पूर्णकरो भवेयम्' म्हणजे माझी ओंझळ करांनीं भरून जाईल."

### सहकारी चळवळीचा सुवर्णमहोत्सव

२५ मार्च हा दिवस पंतप्रधान पं. नेहरू ह्यांना सोईचा नसल्या-कारणानें सहकारी चळवळीचा सुवर्णमहोत्सव पुढें ढकलण्यांत आला होता. आतां ह्या उत्सवाचें उद्घाटन पं. नेहरूंनीं ११ एप्रिल रोजीं मुंबईत करण्याचें मान्य केलें आहे. ११ ते १७ एप्रिल हा आठवडा महोत्सव-सप्ताह म्हणून पाळला जाईल.

## कोल्हापूर येथील बँक नोकरांचें क्रिकेट

ता. ३।३।१९५४ इ. रोजीं शाहूपुरी जिमखाना मैदानावर कोल्हापुरांतील निरनिराळ्या बँक नोकरांचा "बँक नोकर संघ" आणि "शाहू मिल संघ" यांच्या दरम्यान क्रिकेटचा अत्यंत चुरशीचा सामना झाला. नाणें जिंकून शाहू मिल संघानें बरोबर अकरा वाजतां फलंदाजी पत्करली. बँकसंघाचे श्री. जी. एल. जाधव व व्ही. बी. कुलकर्णी यांची गोलंदाजी परिणामकारक ठरली. त्यांनीं अनुक्रमें ३ व ४ गडी बाद करून शाहू मिल संघास ११४ धांवांत तंबूंत पाठविले. शाहूमिलकडून सर्वांत जास्त धांवा श्री. खोत (२०) यांनीं काढल्या. त्यानंतर बँकसंघानें आपल्या डावास सुरवात केली. शाहूमिलचे श्री. प्रभावळकर व श्री. एस. एल. जाधव यांनीं गोलंदाजीस सुरवात केली. श्री. प्रभावळकर यांची गोलंदाजी वाखाणण्यासारखी प्रभावी पडूं लागली व बँकनोकर संघाचा पराभव होणार असें वाटूं लागलें. पण बँकसंघाचे श्री. काळे, अंकलीकर व पाटील (तिघेहि इंपीरियल बँकमधील) यांनीं तडफदार खेळ खेळून संघास विजयश्री मिळवून दिली. श्री. पाटील यांनीं संघाच्या एकूण १२८ धांवांत स्वतःच्या ५४ धांवा केल्या तर श्री. काळे यांनीं स्वतःच्या १६ धांवा काढल्या. श्री. अंकली-कर यांनीं वैयक्तिक धांवा जरी कमी काढल्या तरी ७ व्या विकेटच्या भागिदारींत श्री. पाटील यांना चिकाटीनें साथ दिली. त्यामुळेंच बँकसंघाचा विजय झाला. तसेंच संघाकडून श्री. व्ही. डी. माने व व्ही. एन्. कुलकर्णी (दोघेहि युनियन बँक) यांचा खेळ चांगला झाला. त्यांच्या धांवा अनुक्रमें १६ व २८ आहेत. बँकसंघांत युनियन, युनायटेड कमर्शियल व इंपिरियल बँकमधील नोकरांनीं भाग घेतला. तसेंच युनायटेड कमर्शियलचे अकौंटंट श्री. एल. के. काळे यांनीं उत्साहानें भाग घेऊन सामना जिंक-ण्यास मदत केली. बँकसंघाच्या १२८ धांवा झाल्या म्हणजे १४ धांवांनीं बँकसंघाचा विजय झाला.

(लि. आ. म.)

# भारतांतील विमाव्यवसायांत घट

भारतीय विमा कंपन्यांनीं १९५२ मध्यें १२९·२८ कोटी रु. विमा–रकमेचीं व हप्त्याचें उत्पन्न ६·९६ कोटी रु. येणारीं सुमारें ५,१२,००० नवीन विमापत्रें दिलीं. भारतांत व्यवसाय करणाऱ्या परदेशी कंपन्यांचे हेच आंकडे १६·४० कोटी रु. विमा–रकम, ०·९३ कोटी रु. हप्त्याचें उत्पन्न व सुमारें २२,००० विमापत्रें असे होते. १९३८ च्या विमाकायद्याखालीं नोंदविलेल्या विमाकंपन्यांची संख्या ३० नोव्हेंबर, १९५३ रोजीं ३२२ होती. त्यांपैकीं २२१ कंपन्या भारतीय होत्या व बाकीच्या परदेशी होत्या. भारतीय कंपन्यांपैकीं केवळ आयुर्विम्यांचें काम करणाऱ्या विमा–कंपन्यांची संख्या ११५ होती. ४६ कंपन्या आयुर्विम्यांचें व इतर प्रकारच्या विम्यांचें काम करीत होत्या, तर ६० कंपन्या केवळ आयुर्विमेतर विमाव्यवसाय करीत होत्या. परदेशी कंपन्यांचे बाबतींत हे आंकडे अनुक्रमें ४, १३ व ८४ होते.

१९५१ सालाशीं तुलना करतां. १९५२ मध्यें भारतीय विमा कंपन्यांनीं भारतांत केलेलें आयुर्विम्याचें नवीन काम सुमारें १,००० विमापत्रें, २·१० कोटी रु. विमा रकम आणि ०·२२ कोटी रु. वार्षिक हप्त्याचें उत्पन्न इतक्यांनीं कमी होतें. परदेशी विमा कंपन्यांचे बाबतींतहि भारतांत केलेल्या आयुर्विम्याच्या कामांत थोडी घट दिसून आली. भारतीय विमा कंपन्यांनीं भारतांत केलेला व १९५२ मध्यें अखेर चालू असलेला एकूण निव्वळ आयुर्विमाव्यवसाय सुमारें ३६,७८,००० विमापत्रें, ७८९·८८ कोटी रु. विमा रकम व ३७·९५ कोटी रु. हप्त्याचें उत्पन्न इतका होता. परदेशी विमा कंपन्याचे हेच आंकडे २,४७,००० विमापत्रें, १२६·०२ कोटी रु. विमा रकम आणि ६·९३ कोटी रु. हप्त्याचें उत्पन्न असे होतें.

भारताबाहेर भारतीय विमा कंपन्यांनीं १९५२ मध्यें मिळविलेल्या व त्यावर्षअखेर चालू असलेल्या आयुर्विमाव्यवसायाचे आंकडे अनुक्रमें सुमारें २७,००० विमापत्रें, ११·४३ कोटी रु. विमा रकम व सुमारें २,६५,००० विमापत्रें व ६९·८३ कोटी रु. असे होते.

भारताच्या फाळणीपूर्वीच्या विमावार्षिकांतील विमाव्यवसायाचे आंकडे अखंड भारताचे होते हें लक्षांत घेतलें, तर १९५१ मधील भारयीय संघराज्यांतील विम्याचें काम सर्वांत जास्त विमाव्यवसाय झालेल्या १९४६ सालापेक्षाहि कदाचित् अधिक ठरेल. नियोजन मंडळाच्या विविध योजना, वारसा कर, इत्यादींमुळें आयुर्विमाव्यवसाय वाढेल अशी आशा वाटते. विमापत्रें रद्द होण्याचें प्रमाणहि गेल्या कांहीं वर्षांत फार वाढलें आहे. युद्धकाळांत व त्यानंतर नजिकच्या वर्षांत झालेलें काम कमी दर्जाचें होतें असेंच यावरून दिसतें.

### व्याज व खर्चाचें प्रमाण

विमाकंपन्यांच्या सरासरी आयुर्निधीवर मिळालेल्या सरासरी व्याजाचें प्रमाण किंचित् वाढलें आहे. हप्त्याच्या उत्पन्नाच्या प्रमाणांत एकूण व्यवस्थापकीय खर्चाचें प्रमाण भारतीय व परदेशी विमा कंपन्यांचे बाबतींत अनुक्रमें २७·१ व २२·४ पडलें. मागील वर्षाचे हेच आंकडे अनुक्रमें २७·२ व २३·० टक्के होते.

### मूल्यमापनाचें पृथक्करण

वार्षिकांत ७४ नव्या मूल्यमापनांची माहिती आहे. त्यांपैकी ५४ मध्यें शिल्लक दिसून आली. यांपैकी ३५ कंपन्यांनीं आपली शिल्लक विमेदार आणि किंवा भागीदार यांना विभागून दिली, तर बाकीच्यांनीं ती तशीच ठेवून पुढील हिशेबीं ओढून घेतली. १९ कंपन्यांच्या मूल्यमापनांत तोटा दिसून आला. यांपैकी ७ कंपन्यांनीं तो आपल्या भरणा झालेल्या भांडवलांतून भरून काढला, तर बाकीच्यांचे बाबतींत तसें होऊं शकलें नाहीं.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई
शेअर भांडवल व रिझर्व रु. ११,७०,१००
ठेवी .... .... .... रु. १,१९,११,७००
एकूण खेळतें भांडवल रु. १,३३,९४,९००
शाखा:- बँकेचे सर्व व्यवहार केले जातात शाखा:-
दादर बेळगांव
माहीम पुणें

स्थापना १९१८


### प्रशासकांची नेमणूक

सरकारी व इतर मान्य कर्जरोख्यांत विमा कंपन्यांनीं गुंतविलेल्या मालमत्तेचें प्रमाण कायद्यानें आवश्यक असलेल्या ५० टक्क्यांहूनहि अधिक होतें. १० विमा कंपन्यांचे बाबतींत कारभार पाहण्यासाठीं प्रशासक नेमण्यांत आले. यांपैकी एंपायर ऑफ इंडिया व ज्युपिटर जनरल इन्शुअरन्स या कंपन्यांना त्यांची आर्थिक स्थिति चांगली असल्यानें आयुर्विम्याचें नवीन काम घेण्याला परवानगी देण्यांत आली. बाकीच्यांचे बाबतींत नवीन काम बंद पडलें असून ५२ बी ( १ ) कलमानुसार पुढील उपाययोजना घेण्यांत येत आहेत.

### व्यवस्थापकीय खर्च

१९५१ मध्यें आयुर्विमा व्यवसाय करणाऱ्या ९१ कंपन्यांनीं व इतर विमाव्यवसाय करणाऱ्या ५० कंपन्यांनीं विमानियमांत व घालून दिलेल्या मर्यादेहून अधिक खर्च केला होता. तरी पण त्या कायद्याखालील पहिलेंच वर्ष असल्यानें थोडें नरमाईचें धोरण ठेवण्यांत येऊन आयुर्विम्याचे बाबतींत फक्त १९ भारतीय व एका परदेशी कंपनीस ताकीद देण्यांत आली. इतर प्रकारच्या विम्याचे बाबतींत अशा १३ भारतीय व ६ परदेशी कंपन्यांना ताकीद देण्यांत आली.

### हक्कपूर्तीबाबत प्रकरणें

विमा कायद्याच्या ४७ ए नियमानुसार २,००० रु. हून कमी रकमेच्या विम्याचे बाबतींत हक्कपूर्तीबाबत वाद असल्यास तीं प्रकरणें नियंत्रण अधिकाऱ्यांनीं निकालांत काढावयाचीं आहेत. आतांपर्यंत अशीं ७२ प्रकरणें त्यांचेकडे आलीं. त्यांपैकी १८ स्वीकारण्यांत आलीं नाहींत व २६ मागें घेण्यांत आलीं. निर्णय दिलेल्या १६ प्रकरणांपैकीं १३ प्रकरणीं हक्कदारांचे बाजूनें व ३ प्रकरणीं कंपनीचे बाजूनें निकाल लागला. अद्यापि १२ अर्ज निकालांत निघावयाचे आहेत. या कलमाखालील तरतुदी नीटशा माहीत नसल्यामुळें एवढ्या कमी तक्रारी आल्या असतील असें धरून चाललें, तरी वादग्रस्त हक्कपूर्तीचें प्रमाण नक्कीच अल्प असून विमा कंपन्यांना तें कांहीं अंशीं प्रशंसनीय आहे.

---

### महाबळेश्वराच्या मधास पहिलीं बक्षिसें

दिल्ली येथें नुकत्याच भरलेल्या अखिल भारतीय मध प्रदर्शनांत महाबळेश्वर येथें तयार झालेल्या मधास तीन पहिलीं बक्षिसें मिळालीं. व्हिलेज इंडस्ट्रीज कमिटी ( महाराष्ट्र विभाग ) नें हा मध तयार केलेला होता.

## कण आणि क्षण

(लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक, अर्थ, पुणें ४; पृ. सं. १६८। किं. २॥ रु.) श्री. श्री. वा. काळे ह्यांचें "कण आणि क्षण" हें पुस्तक वाचून फार समाधान वाटलें. लेखकानें साध्या व्यवहारांतल्या गोष्टींबद्दल लिहिलें असलें तरी सर्वत्र मार्मिक निरीक्षण दिसून येतें. सकृद्दर्शनीं क्षुल्लक दिसणाऱ्या गोष्टींचें संकलन करून लेखकानें मोठें काम केलें आहे. माझ्याहि ध्यानांत त्यांतल्या पुष्कळ बाबी कित्येक वेळां आल्या असून त्याविषयीं मी लहान मंडळींस अनेकदां सांगत असे. हें पुस्तक शाळांतील मुलामुलींनीं वाचलें व त्यांतील उपदेश ध्यानांत धरून तो आचरणांत आणण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्या सुखांत महत्त्वाची भर पडेल यांत शंका नाहीं. मानवी जीवनांत मोठमोठे प्रसंग थोडेच येत असतात. असंख्य लहान लहान प्रसंगांची बेरीज केली तर ती अपवादात्मक व क्वचित् होणाऱ्या घटनांपेक्षा निःसंशय जास्त भरेल. हा धडा मुलांच्या नेहमींच्या वाचण्यांत येणाऱ्या पुस्तकांत फारसा आढळत नाहीं. लिखाणांत नाजूक व मार्मिक विनोद क्षणोक्षणीं दिसून येतो. हें पुस्तक लिहिल्याबद्दल मी लेखकाचे मनापासून अभिनंदन करून पुस्तकाचें स्वागत करतों व लेखकानें असेंच पुढें लिहावें अशी आशा बाळगतों.

—डॉ. सर र. पु. परांजपे,
"केसरी"

### पोस्टल बँकांत चेकची सोय

पो. ऑ. सेव्हिंग्ज बँकांतील पैसे चेकनें काढतां येण्याची सोय प्रथम मुंबईच्या जनरल पोस्ट ऑफिसांत सुरू केली जाईल. मुंबई सर्कलमधील इतर कांहीं हेड पोस्ट ऑफिसांचाहि ह्या प्रयोगांत समावेश केला जाईल. चेकची पद्धत सुरू करण्याचें मार्गांत अनेक अडचणी आहेत, त्या दूर कराव्या लागतील. निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्टांत दुरुस्ती त्यासाठीं लवकरच केली जाईल.

### फेडरेशनच्या कमिटीवर श्री. किर्लोस्कर

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲंड इंडस्ट्रीच्या कमिटीवर श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांची योजना करण्यांत आली आहे. फेडरेशनचे १९५४-५५ चे अध्यक्ष श्री. बी. एम्. बिर्ला हे असून उपाध्यक्ष श्री. शांतिलाल मंगळदास हे आहेत.

### दि हिंदुस्थान स्पन पाइप्स लि.

वरील कंपनीची मुख्य कचेरी ४०५, नारायण पेठ, पुणें, येथें होती ती आतां कन्स्ट्रक्शन हाउस, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई, येथें गेली आहे. श्री. रतनचंद हिराचंद, एम. ए., ह्यांची कंपनीचे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून नेमणूक झाली आहे.

### हिंदी शेतकऱ्यांचा अमेरिकन शेतीचा अभ्यास

इंटर नॅशनल फार्म यूथ एक्सचेंज कार्यक्रमानुसार, अमेरिकेंतील शेतकऱ्यांच्या कुटुंबांत सहा महिने राहून तेथील शेतीचा अभ्यास करण्यासाठीं २५ हिंदी शेतकऱ्यांची निवड करण्यांत आली आहे. राज्यसरकारांनीं शिफारस केलेल्या शेतकऱ्यांची मध्यवर्ती अन्न व शेती खात्यातर्फे मुलाखत घेण्यांत येऊन हे २५ जण निवडक करण्यांत आले. मुंबई राज्यांतील खालील तीन शेतकऱ्यांना अमेरिकेस जाण्याची संधि मिळणार आहे:— के. एच. हिंदळेकर, व्ही. एन. गायकवाड व ए. के. जव्हेरी.


# दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर
शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

*—यथावत् बँकिंग व्यवहार केले जातात—*

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली — चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, — व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B. — मॅनेजर

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जे देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जे देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

एक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षे २॥ टक्के, ५ वर्षे ३ टक्के, ७ वर्षे ३॥ टक्के, १० वर्षे ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरिज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रबडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## इंटरनॅशनल बँकेनें मंजूर केलेलीं व दिलेलीं कर्जें

( दशलक्ष अमेरिकन डॉलर्स )

| देश | मुद्दल | दिलेलीं कर्जें | अद्याप द्यावयाचीं कर्जें | परतफेड | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | १९४७-१९५२ | १९५३ |
| आस्ट्रेलिया | १५०·० | १२४·८ | २५·२ | — | — |
| बेल्जम | ८६·० | ७०·६ | १५·४ | — | — |
| ब्राझील | १७५·३ | १०३·४ | ७१·९ | — | ·५ |
| चिली | ३७·३ | १५·२ | २२·१ | ·६ | ·३ |
| कोलंबिया | ६९·३ | ३१·८ | ३७·५ | ·५ | — |
| डेन्मार्क | ४०·० | ४०·० | — | — | .६ |
| एल सालवेडॉर | १२·५ | ११·९ | ·६ | — | — |
| एथिओपिया | ८·५५ | ५·४ | ३·१ | — | — |
| फिनलंड | ३८·१ | २६·७ | ११·४ | २ १ | ·१ |
| फ्रान्स | २५०·० | २५०·० | — | — | — |
| आइसलंड | ५·९ | ४·५ | १·४ | — | — |
| इंडिया | १०९·८५ | ५४·३ | ५५·५ | ४·७ | ·४ |
| इराक | १२·८ | ५·९ | ६·९ | — | — |
| इटली | २०·० | १०·० | १०·० | — | — |
| जपान | ४०·२ | — | ४०·२ | — | — |
| लक्झेंबर्ग | ११·८ | ११·८ | — | ·२ | — |
| मेक्सिको | ८०·३ | ५९·४ | २०·९ | — | ·९ |
| नेदरलंडस | २२१·५ | २२१·५ | — | — | ·८ |
| निकॉरग्वे | ९ २ | ३·४ | ५·८ | — | ·३ |
| पाकिस्तान | ३०·४५ | १०·५ | १९·९ | — | — |
| पनामा | १·५ | — | १·५ | — | — |
| पॅराग्वे | ५·० | १·५ | ३·५ | — | — |
| पेरू | ३·८ | २·४ | १·४ | — | — |
| थायलंड | २५·४ | २०·९ | ४·५ | — | — |
| टर्की | ५९·६ | १३·९ | ४५·७ | — | — |
| द. आफ्रिका | ११०·० | ५७·७ | ५२·३ | — | — |
| उ. र्‍होडेशिया | १४·० | ८·६ | ५ ४ | — | — |
| द. र्‍होडेशिया | २८·० | १४·० | १४·० | — | — |
| युराग्वे | ३३·० | १८·४ | १४·६ | — | — |
| युगोस्लाव्हिया | ६०·७ | ३७·८ | २२·९ | २·७ | — |
| एकूण | १,७४९,९ | १,२३६,३ | ५१३·६ | १०·८ | ३·९ |

## नव्या करांच्या तपशिलाची पुस्तिका चुकीनें वाटली

"अर्थमंत्र्यांच्या बजेट भाषणाचे दोन भाग असतात. "अ" भागांत आढावा घेतलेला असतो व "ब" भागांत नव्या कराबाबत तपशील असतो. पार्लमेंटांत अर्थमंत्र्यांनीं नव्या करांची घोषणा करण्यापूर्वींच "अ" ऐवजीं "ब" भागाच्या कांहीं प्रती वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना देण्यांत आल्या. थोड्याच सेकंदांत ही चूक लक्षांत आल्यावर त्या प्रती परत घेण्यांत आल्या. त्यामुळें, गौप्यस्फोट होऊं शकला नाहीं. ज्याच्याकडे प्रती वाटण्याचें काम होतें, तो मनुष्य हें काम कित्येक वर्षें करीत आला आहे. अशी चूक पुनः होऊं नये, म्हणून ह्यापुढें "ब" भागाच्या पुस्तिका अर्थमंत्र्यांचें भाषण सुरू झाल्यानंतर अर्ध्या तासानें त्यांच्या कचेरींतून घेतल्या जाव्यात; "अ" भागाबरोबर त्या मिळूंच नयेत, अशी व्यवस्था केली जाणार आहे." माहिती खात्याचे मंत्री डॉ. केसकर ह्यांनीं पार्लमेंटांत वरील माहिती सांगून, झालेल्या चुकीबद्दल दिलगिरी व्यक्त केली.

## कोणत्या चलनांत कर्जें दिलीं व कोणत्या चलनांत फेडणार

| चलन | दिलेलीं कर्जें | |
|---|---|---|
| | एकूण | व्हावयाची परतफेड |
| ऑस्ट्रिअन शिलिंग | ·२ | ·२ |
| बेल्जिअन फ्रँक्स | ३१·६ | ५·० |
| कनेडिअन डॉलर्स | ५५·७ | ५१·५ |
| डॅनिश क्रोनर | १·४ | १·१ |
| फ्रेंच फ्रँक | १६·५ | १५·२ |
| जर्मन मार्क | ११·० | — |
| इटालिअन लिरा | ४·५ | २·९ |
| नेदरलंडस गिल्डर्स | ३·१ | ·६ |
| नॉर्वेजिअन क्रोनर | ·२ | ·१ |
| स्वीडिश क्रोनर | ४·९ | १·० |
| स्विस फ्रँक | २१·० | ४२·५ |
| द. आ. पौंड | २·१ | २·१ |
| पौंड स्टर्लिंग | ८५·७ | १६·४ |
| यु. स्टेट डॉलर्स | ९९८·४ | १०९७·७ |
| एकूण | १,२३६·३ | १,२३६·३ |

## शास्त्री अवार्डमधून ग्रामीण बँकांची मुक्तता

ग्रामीण भागांतील ( ३०,००० खालील लोकवस्तीच्या ठिकाणीं ) बँकनोकरांच्या सध्यांच्या वेतनश्रेणींत वाढ केली जाऊं नये, असा अर्ज भारत सरकारतर्फे लेबर अपेलेट ट्रायब्यूनलकडे करण्यांत आला होता. सध्यां अस्तित्वांत असलेल्या कचेर्‍यांना २ वर्षें व नवीन निघणार्‍या कचेर्‍यांना ४ वर्षें शास्त्री अवार्ड लागू होऊं नये अशी बँकिंगच्या प्रसाराच्या दृष्टीनें भारत सरकारची ट्रायब्यूनलकडे मागणी आहे. ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशनच्या वतीनें अर्जास हरकत घेण्यांत आली. ट्रायब्यूनलनें सरकारचा अर्ज फेटाळला. मात्र, युनायटेड बँक ऑफ इंडियानें केलेल्या अर्जाच्या सुनावणीचे वेळीं सरकारास त्यांत भाग घेतां येईल, असें ट्रायब्यूनलनें ठरविलें.

## सटाणा औद्योगिक सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासचा रिझल्ट

नासिक जिल्ह्यासाठीं सटाणे येथें भरलेल्या औद्योगिक सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासच्या परीक्षेचा रिझल्ट नुकताच लागला असून, त्या परीक्षेस २० विद्यार्थी बसले होते त्यांपैकी १८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यांत खालील पहिले ४ द्वितीय श्रेणींत आणि त्यानंतरचे १४ तृतीय श्रेणींत उत्तीर्ण झालेले आहेत.

१ बाबुराव शामजी जाधव, २ गंगाराम परशराम पंडीत, ३ नागु तोताराम पाटील, ४ बाबुराव देवबा जाधव, ५ जगन्नाथ नारायण हिरे, ६ हिरामण भगवान शिंदे, ७ पंडीत मोतीराम पवार, ८ मधुकर दत्तात्रय कुलकर्णी, ९ रामराव शंकर पाटील, १० तुळसीराम मोतीराम पवार, ११ बाबुराव शिवनन सावकार, १२ बाळू केशव कुमावत, १३ किसन लक्ष्मण वडगे, १४ बाबुराव गणपत वाघ, १५ मुरलीधर लक्ष्मण अहिरे, १६ बळीराम कृष्णा पाटील, १७ विठ्ठल दौलत कदम, १८ शेख अकबर शेख दादामिया.

एन्. वाय. कुलकर्णी
को. ट्रेनिंग इन्स्पेक्टर, नाशिक.


"पांच आशादायक वर्षे ! रचना व निर्मिति करण्याचा हा काल. या कालांत माझ्या बालकाच्या आरोग्याची निगा राखली जाईल. त्याला मोफत शिक्षण मिळेल. माझ्या कुटुंबाच्या पोषणाची कसलीहि चिंता उरणार नाही...जर अधिक कष्ट केले तर आपलें म्हणतां येईल असें घर सुद्धां बांधतां येईल. !"

पंचवार्षिक योजना-निधीचा जवळजवळ एक चतुर्थांश आपल्या सामाजिक कार्याचें क्षेत्र सुधारण्यास व विस्तृत करण्यास वापरला जाईल. ४२५ कोट रूपये जनतेच्या राहणीचें मान वाढविण्यास खर्च केले जातील. त्यांतून १३,००० नवीन डॉक्टर्स, २०,००० नवीन नर्सेस व मिड-वाइव्हस् शिकवून तयार करण्यात येतील. इ. स. १९५६ पर्यंत सहावर्षांवरील ६० टक्क्यांहून अधिक मुलें आपल्या प्राथमिक शाळांत असतील. ही दूरगामी योजना आपला भावी कालावरील विश्वास व्यक्त करते. हीच खरोखर......

## भावी पिढीसाठीं प्रतिज्ञा

पंचवार्षिक योजनेंतील विविध कल्पना अमलांत आणण्यासाठीं लाखो टन पोलाद वापरलें जाईल, आणि म्हणून, आपल्या राष्ट्राच्या व जनतेच्या अधिक सुसंपन्न व अधिक फलदायी भविष्याचा पाया घालण्यांत पोलाद अनेक महत्त्वपूर्ण तऱ्हेनें उपयोगास येईल.

दी टाटा आयर्न अॅन्ड स्टील कंपनी लिमिटेड.



हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.